अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर .
मा. स्थायी समिती सभा क्र.१४

विषय क्रमांक - १ दिनांक. ४ /१२/२००६

---

ठराव क्रमांक - १ दिनांक .४/१२/२००६

**प्रस्तावाचा विषय -** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) चे तरतूदी नुसार मा.स्थायी समिती सभापती पदावर सभापतीची निवड करणे .

**प्रस्तावाचा मजकूर** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(५) अन्वये स्थायी समितीच्या ८ सभासंदाची निवड करणेसाठी दिनांक २८/११/२००६ रोजी विशेष सभा सकाळी ११.०० वाजता महानगरपालिकेच्या सभागृहात घेण्यांत आली.

सदरच्या स्थायी समिती सदस्य निवडणुकीसाठी २४ (चोवीस) उमेदवारांनी २८ नामनिर्देशन पत्र भरले होते. त्या चोवीस उमेदवारांची नांवे खालील प्रमाणे.

| अ.नं. | उमेदवारांचे नांव |
|---|---|
| १ | अशोक नाथा कानडे |
| २ | खरपुडे जयश्री सुरेश |
| ३ | नरेंद्र सच्चिंदानंद कुलकर्णी |
| ४ | अविनाश हरिभाउ घुले |
| ५ | बोरूडे इंदूबाई परशुराम |
| ६ | सोमनाथ सोपानराव लोंढे |
| ७ | शेख अरिफ शेख रफियोद्यीन |
| ८ | शेख अरिफ शेख रफियोद्यीन |
| ९ | अशोक नाथा कानडे |
| १० | मैड सतिष बबनराव |
| ११ | सौ.भागानगरे मनिषा प्रकाश |
| १२ | जाधव कृष्णा दत्तात्रय |
| १३ | पाउलबुधे विनीत नाथ |
| १४ | बोरूडे इंदुबाई परशुराम |
| १५ | तिवारी सुरेश रतनप्रसाद |
| १६ | सौ.शिंदे कांताबाई अरूण |
| १७ | दिघे विमल रामचंद्र |
| १८ | दशरथ बाबु शिंदे |
| १९ | सौ.गुरूड राधा रमेश |
| २० | सौ.शेंडगे रोहिणी संजय |
| २१ | सौ.मुदगल सुनिता दत्तात्रय |
| २२ | सौ.गुरूड राधा रमेश |

| | |
|---|---|
| २३ | संजय पाडुरंग लोंढे |
| २४ | विजय नाना गव्हाळे |
| २५ | विमल रामचंद्र दिघे |
| २६ | कुरेशी मुश्ताक इब्राहिम |
| २७ | संध्या बाळासाहेब पवार |
| २८ | कांबळे मंगला राजकुमार |

विशेष सभा सुरू झाले नंतर पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी अर्जाची छाननी केली सर्व उमेदवारी अर्ज वैध ठरविण्यांत आले.

पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्यांसाठी सकाळी ११.५० ते दुपारी १२.२० अशी ३० मिनिटांची वेळ देण्यांत आली वरील मुदत संपल्यावर सदस्यांच्या मागणीवरून आणखी १५ मिनिटाची वेळ देण्यांत आली त्यानंतर दुपारी १२.३५ नंतर पुन्हा १० मिनीटे वाढविण्यांत आली दुपारी १२.४५ नंतर पुन्हा १२.४५ ते १.२५ अशी वेळ वाढविण्यांत आली वरील मुदतीत १६ उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली ते खालील प्रमाणे.

| अ.नं. | उमेदवारांचे नाव |
|---|---|
| १ | अशोक नाथा कानडे |
| २ | खरपुडे जयश्री सुरेश |
| ३ | नरेंद्र सच्चिंदानंद कुलकर्णी |
| ४ | बोरूडे इंदूबाई परशुराम |
| ५ | सोमनाथ सोपानराव लोंढे |
| ६ | जाधव कृष्णा दत्तात्रय |
| ७ | पाउलबुधे विनीत नाथ |
| ८ | सौ.शिंदे कांताबाई अरूण |
| ९ | दिघे विमल रामचंद्र |
| १० | दशरथ बाबु शिंदे |
| ११ | सौ.दहिफळे कविता अशोक |
| १२ | सौ.मुदगल सुनिता दत्तात्रय |
| १३ | सौ.गुरूड राधा रमेश |
| १४ | संजय पाडुरंग लोंढे |
| १५ | विजय नाना गव्हाळे |
| १६ | कुरेशी मुश्ताक इब्राहिम |

वरील १६ (सोळा) उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज (नामनिर्देशनपत्र) मागे घेतल्याने फक्त आठ उमेदवार निवडणुक रिंगणात शिल्लक राहीले. मा.स्थायी समितीत एकूण आठ सदस्य निवडून द्यावयाचे असल्याने पिठासीन अधिकारी यांनी आठ उमेदवार रितसर बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर केले. बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांची नांवे खालील प्रमाणे.

| अ.नं. | उमेदवारांचे नाव |
|---|---|
| १ | श्री अविनाश हरिभाउ घुले |
| २ | श्री शेख अरिफ शेख रफियोद्दीन |
| ३ | श्री मैड सतिष बबनराव |
| ४ | सौ.भागानगरे मनिषा प्रकाश |
| ५ | श्री तिवारी सुरश रतनप्रसाद |
| ६ | सौ.शेंडगे रोहिणी संजय |
| ७ | सौ.संध्या बाळासाहेब पवार |
| ८ | सौ.कांबळे मंगला राजकुमार |

वरील प्रमाणे निवडणुक प्रक्रिया संपल्यानंतर सर्वाचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**ठराव -**मुंबई प्रांतिक महाागरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) चे तरतूदी नुसार मा.स्थायी समिती सदस्यांमधून स्थायी समिती सभापती पदी निवड करणे कामी बोलावण्यांत आल्या प्रमाणे मा.स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक ४/१२/२००६ रोजी सकाळी ११=०० वाजता मा.महानगरपालिका सभागृहा मध्ये भरली असतां खालील प्रमाणे स्थायी समिती सदस्य उपस्थित होते .

१. मा श्री. घुले अविनाश हरिभाउ
२. मा. श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन
३. मा. श्री. मैड सतिष बबनराव
४. मा.सौ .भागानगरे मनिषा प्रकाश
५. मा.श्री. तिवारी सुरेश रतनप्रसाद
६. मा.सौ. शेडगे रोहिणी संजय
७. मा.सौ .पवार संध्या बाळासाहेब
८. मा.सौ .कांबळे मंगला राजकुमार
९. मा.सौ. काळे गितांजली सुनिल
१०. मा.श्री. जोशी अनंत सुर्यकांत
११. मा.श्री. बारस्कर पोपटराव जगन्नाथ
१२. मा.श्री. बोरूडे अनिल वसंतराव
१३. मा.श्री. सय्यद सादिक आरिफ
१४. मा .श्री .लोंढे सुभाष सोपानराव
१५. मा.श्री. शेख मुदस्सर अहमद इसहाक

सभे करिता आवश्यक गणपूर्ती झाल्याने सभेच्या कामकाजास सुरूवात करण्यांत आली. सभेच्या सुरूवातीस मा.श्री देशमुख सु.वि.उपायुक्त यांनी आजच्या सभेस गणपूर्ती झालेली असून सभेची कामकाज पत्रिका सर्वाना देण्यांत आलेली आहे. आजच्या सभेत मा.स्थायी समितीचे नविन सभापतीची निवड करणे आहे. महानगरपालिका ठराव नं. १ दिनांक २८/११/२००६ अन्वये दिनांक

१/१२/२००६ रोजी रिक्त झालेल्या मा.स्थायी समिती सदस्यांचे जागी नविन आठ सदस्यांची निवड केलेली आहे. मावळते सभापती श्री. कुलकर्णी नरेंद्र सच्चिंदानंद हे दिनांक १/१२/२००६ रोजी - निवृत्त झालेले असल्याने आजचे सभेचे कामकाजा करिता पिठासीन अधिकारी म्हणून समिती सदस्यामधून एका सदस्यांची निवड करणे आवश्यक असल्याने सदस्यांनी पिठासीन अधिकारी म्हणून नांव सुचविणे बाबत आवाहान केले असता मा.श्री. जोशी अनंत सुर्यकांत हे सभेचे पिठासी-न अधिकारी असावेत अशा बाबत मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव यांनी सुचना मांडली त्यास मा.श्री. बारस्कर पोपटराव जगन्नाथ यानी अनुमोदन दिले. त्यास सर्व उपस्थित सदस्यांनी संम्मती दिल्याने पिठासीन अधिकारी म्हणून श्री. जोशी अनंत सुर्यकंात यांची निवड करण्यांत आली त्यांचे अध्यक्षते खाली निवडणूकीची प्रक्रिया सुरू करण्यांत आली .

सकाळी ११=१५ ते ११=४५ वाजेपर्यत मा.स्थायी समिती सभापती पदासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करणे करिता वेळ देण्यांत आली असता मुदती मध्ये खालील प्रमाणे दोन सदस्यांचे पांच उमेदवारी (नामनिर्देशन पत्र )अर्ज प्राप्त झाले .

१. मा.श्री.लोंढे सुभाष सोपानराव
   सुचक -मा.श्री. बारस्कर पोपटराव जगन्नाथ
२. मा.श्री.लोंढे सुभाष सोपानराव
   सुचक- मा.सौ. शेडगे रोहिणी संजय
३. मा.श्री.लोंढे सुभाष सोपानराव
   सुचक- मा.श्री. बोरूडे अनिल वसंतराव
४. मा.श्री.लोंढे सुभाष सोपानराव
   सुचक -मा.श्री. घुले अविनाश हरिभाउ
५. मा.श्री.शेख आरिफ शेख रफिउद्दीन
   सुचक- मा.सौ.पवार संध्या बाळासाहेब

उपरोक्त प्रमाणे आलेल्या पांचही नाम निर्देशन पत्राची छाननी (सकाळी ११=४५ ते सकाळी ११=५० या वेळात ) केली असता दोही उमेदवाराचे नाम निर्देशन पत्र विधीग्राहय असल्याने ते स्विकाण्यांत आल्याचे घोषित करण्यांत आले .

त्या नंतर उमेदवारी मागे घेण्या साठी सकाळी ११=५० ते दुपारी १२=१० वाजे पर्यत मुदत देण्यांत आली.उपरोक्त वेळे मध्ये कुणीही उमेदवारी माघारी न घेतल्याने व दोन उमेदवार शिल्लक असल्याने .बारा खडीचे वर्ण मालेनुसार मतपत्रिके वर प्रथम क्रमांकावर श्री. लोंढे सुभाष सोपानराव व द्वितीय क्रमांकावर श्री.शेख आरिफ शेख रफिउद्दीन या प्रमाणे नांवे असतील मा.सदस्यांनी आपले मत हात उंच करून (उभारून) द्यावयाचे असून ज्यांना जास्त मते पडतील ते निवडून आल्याचे जाहिर करण्यांत येईल व दोन ही उमेदवारांना समसमान मते पडल्यास त्यांच्या नांवाच्या चिठ्ठया टाकून सभापती निवडीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. अशा प्रमाणे निवडणूक प्रक्रिये बाबत मा.उपायुक्त श्री.देशमुख साहेब यांनी माहिती दिली.

मतदान प्रक्रिया सुरू केले नंतर मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव यांचे बाजूने -

१. मा.श्री. घुले अविनाश हरिभाउ
२. मा.सौ .भागानगरे मनिषा प्रकाश
३. मा. श्री. तिवारी सुरेश रतनप्रसाद
४. मा.सौ .काळे गितांजली सुनिल

५. मा.श्री. जोशी अनंत सुर्यकांत
६. मा.श्री. बारस्कर पोपटराव जगन्नाथ
७. मा. श्री. बोरूडे अनिल वसंतराव
८. मा.सौ .शेडगे रोहिणी संजय
९. मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव

यांनी आपले मत हात वर करून दिले.

तसेच मा.श्री .शेख आरिफ शेख रफिउद्दीन यांचे बाजने -

१. मा.श्री. मैड सतिष बबनराव
२. मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब
३. मा.सौ .कांबळे मंगला राजकुमार
४. मा.श्री. सय्यद सादिक आरिफ
५. मा.श्री.शेख मुदस्सर अहमद इसहाक
६. मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

यांनी आपले मत हात वर करून दिले .

या प्रमाणे मतदान घेण्यांत आले असतां मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव यांना नउ व मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन यांना सहा मते मिळाली मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन यांचे पेक्षा मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव यांना तीन मते जादा मिळाली असल्याने पिठासीन अधिकारी यांनी मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव यांची स्थायी समिती सभापती पदी निवड झाल्याचे जाहिर केले.

सही/-
पिठासीन अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका.

खरी नक्कल

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर .
## मा. स्थायी समिती सभा क्र.२०

विषय क्रमांक - ३ दिनांक. २८/२/२००७

---

ठराव क्रमांक - ३ दिनांक. २८/२/२००७

**प्रस्तावाचा विषय** - सन २००७-२००८ या आर्थिक वर्षा करिता जकात वसुली कामी जकात अभिकर्ता नेमणे विषयी चालू असलेली निविदा प्रक्रिया रद्द करणे बाबत.मा.स्थायी समिती सदस्य मा.श्री सुनिल त्रिपाठी,मा.श्री अनंत जोशी, मा.श्री सतिश मैड ,मा.श्री.अविनाश घुले ,मा.श्री पोपट बारस्कर,मा.श्री सुरेश तिवारी, मा.श्री शेख मुदस्सर ,मा.श्री शेख अरिफ यांची यादी यादीवर सभेत झालेली चर्चा .

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिका महासभा दिनांक २०/२/२००७ चे अंदाज पत्रकीय सभे मध्ये मा.सभापती स्थायी समिती यांचे सुचने नुसार पारीत केलेल्या ठराव क्रमांक दोन मध्ये

अ) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकास पूर्वीचा किमान एक वर्षाचा अनुभव व एका वर्षात किमान ३० कोटी रकमेचा जकात वसुलीचा अनुभव असावा.

ब) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकाने पूर्ण झालेल्या लगतच्या मागील तीन वर्षात म्हणजेच सन २००३-२००४,२००४-२००५,२००५-२००६ मध्ये किमान देकार रकमे इतक्या आर्थिक रकमेची उलाढाल केलेली असावी. व त्यासाठी तीन वर्षाचे लेखा परिक्षण करण्यांत आलेले लेखा विविरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

क) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकांची भांडवली स्थिती किमान देकार रकमेच्या किमान पांच टक्के एवढी असावी.व त्यासाठी सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

ड) संयुक्त पणे (जॉईन्ट व्हेंचर) अन्वये सादर केलेली निविदा ग्राहय धरण्यांत येवू नये.

ई) निविदे सोबत बयाना रक्कमही नियमाप्रमाणे भरून घेण्यांत यावी.अनामत रक्कम भरून घेतांना बॅन्क गॅरंटी किंवा धनादेश किंवा रोख स्वरूपात स्विकारणे बाबत कार्यवाही करतांना मूळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक ठेवावे तसेच सदर कार्यवाही किमान एक दिवस अगोदर होणे आवश्यक आहे.

या प्रमाणे अटी शर्तीचा समावेश करूनच सन २००७-२००८ या आर्थिक वर्षा करिता जकात वसुली साठी अभिकर्ता नेमणे कामी चालू असलेली निविदा प्रक्रिया रद्य करून निविदा मागविणे बाबत ठराव पारीत केला आहे. त्या प्रमाणे सन २००७-२००८ चे जकात वसुली कामी अभिकर्ता नेमणे बाबतची प्रक्रिया तत्काळ रद्य करून नविन अटी शर्तीचा समावेश करून नविन निवदा मागविण्यांत याव्यात

नियमानुसार कार्यवाही करावी.
सुचक - मा.श्री जोशी अ.सु.
अनुमोदाक - मा.श्री त्रिपाठी सु.चं.
ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

या प्रमाणे अटी शर्तीचा समावेश करूनच सन २००७-२००८ या आर्थिक वर्षा करिता जकात वसुलीसाठी अभिकर्ता नेमणे कामी चालू असलेली निविदा प्रक्रिया रद्य करून निविदा मागविणे बाबत मा.महासभेने ठराव पारीत केलेला आहे.

परंतु मा.महासभेचे ठराव क्रमांक दिनांक २०/२/२००७ चे ठरावा प्रमाणे सध्या चालू असलेली प्रक्रिया सन २००७-२००८ चे जकात कर वसुली कामी अभिकर्ता नेमणे बाबत ची प्रक्रिया तत्काळ रद्य करून नविन अटी शर्ती समावेश करून निविदा मागविण्यांत याव्यात.

सुचक - मा.श्री

अनुमोदाक - मा.श्री

ठराव सर्वानुमते मंजूर .

विनंती यादी देण्यांत येते कि, मा.महासभा दिनांक २०२/२००७ चे अंदाज पत्रकीय सभे मध्ये मा.सभापती साहेब स्थायी समिती यांचे सूचने नुसार आगामी २००७-२००८ या वर्षा करिता जकात वसुली कामी अभिकर्ता नेमणुकी कामी निविदा अटी शर्ती समाविष्ट करण्याचे मान्य करण्यात आले आहे. परंतु मा.आयुक्त साहेबांनी सदर बाबत जी निविदा प्रक्रिया पार पाडली आहे,त्यास मध्ये या अटींचा समावेश करण्यात आलेली नाही.चालू व मागील आर्थिक वर्षात अभिकर्त्याचे नियुक्तीमुळे मनपाची वेळोवेळी झालेली बदनामी तसेच आलेल्या तक्रारी विचारात घेता चागंल्या अभिकर्त्याची नियुक्ती होणे मनपाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. केवळ निधी जमा करून विकास कामे करणे स्थानिक स्वराज्य संस्थे कडून अपेक्षित नसून सोईस्कर व योग्य कर करदात्या कडून वसुल करून त्या उत्पन्नातून नागरी सुविधा पुरविणे आवश्यक आहे. या बाबीची विचार करून मनप अधिनियम नुसार स्थायी समिती प्राप्त अधिकारात सध्या जकात अभिकर्ता नेमणे कामी चालू असलेली प्रक्रिया करण्यांत येवून मा.महासभेचे अंदाजपत्रकीय दि.२०/२/२००७ चे महासभेत घेतलेल्या निर्णयानुसार नविन अटी शर्तीचा समावेश करून नविन निवीदा मागविणे तसेच कामी प्रक्रिया वेळेत पूर्ण करिता सदर कामी कमी मुदतीने जाहीर निविदा मागविणे विषयी मा.स्थायी समितीचे सभेत आयत्या वेळचा विषय घेवून तसा ठराव मंजूर करणेत यावा.

मा.स्थायी समिती सभा दि.२३/१/२००७ दिनांक २/२/२००७ व दिनांक ११/२/२००७ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे विषयी सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

मा.स्थायी समितीचे दिनांक ११/२/२००७ रोजीचे सभेत अहमदनगर महानगरपालिकेचे जकात हद्यीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावरील जकात वसुलीची जकात ठेक्याची रक्कम निश्चीत करून जकात अभिकर्ता नेमणे कामी जाहीर निविदा मागविणेस मंजूरी देण्यांत आलेली असून सभेने मंजूर केलेला ठराव संबधीत विभागाकडेस पाठविण्यांत आलेला आहे.सदरचे ठरावामध्ये काही अटी शर्ती नमूद करणे आवश्यक होते. (राहिले होते.) परंतु अहमदनगर महानगरपालिका महासभा दि.२०/२/२००७ अंदाज पत्रकीय सभा ठराव क्रमांक दोन मध्ये

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर .

मा. स्थायी समिती सभा क्र.७

विषय क्रमांक - ७ दिनांक १४ /८/०४

---

ठराव क्रमांक - ७/१ दिनांक १४/८/२००४

**प्रस्तावाचा विषय** - अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना सुचिवरील वैधानिक पदांवरील नियुक्ती करणे बाबतचे ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ .

**प्रस्तावाचा मजकूर** - अहमदनगर महानगरपालिकेचे दि.३०/६/२००३ च्या अधिसुचनेनुसार महानगरपालिकेत रूपांतर करण्यांत आलेले आहे. तद्नंतर मा.प्रशासक ठराव नं. १ दि. १४/७/०३ अन्वये मंजूरी दिल्याप्रमाणे विविध वैज्ञाधिक पदे मंजूर करणे बाबतचा प्रस्ताव मा.सचिव,नगरविकास विभाग यांचे कडे सादर करण्यांत आला होता. सदर प्रस्तावा प्रमाणे मा.सचिव,नगरविकास यांनी निर्णय क्र.१०२००३/१८९४/प्र.क्र.२०८/०३ नवि २४ दि.१८/९/०३ अन्वये खालील पदांना मंजूरी दिलेली आहे.

१. आयुक्त १ पद २. शहर अभियंता १ पद ३. वैद्यकीय आरोग्य अधिकारी १ पद ४. मुख्य लेखा परिक्षक १ पद ५. नगरसचिव १ पद ६. उपायुक्त २ पदे ७. सहाय्यक आयुक्त १ पद

वरील पदांपैकी आयुक्त पदांवर उपायुक्त पदांवर शासनाकडून नियुक्ती झालेली असून नगरसचिव ,मुख्य लेखा परिक्षक ,व शहर अभियंता या पदावर प्रभारी म्हणून अनुक्रमे एन.जी चत्तर ,श्री पी.आर गोरे , व श्री एन.बी.मगर यांची नियुक्ती केलेली आहे. सदर पदावर काम करणारे अधिकारी यांची सध्याची पदाची वेतनश्रेणी व शासनाने मंजूर केलेली वेतनश्रेणी समकक्ष आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने नागरिकांना त्या त्या भागातील सेवा उदा.- आरोग्य ,पाणी,लाईट इत्यादी पुरवण्यिांसाठी विभागीय कार्यालय सुरू करण्यांचा निर्णय घेतलेला असून सदर निर्णयाप्रमाणे दि.१९/७/०४ पासून सावेडी उपकार्यालय सुरू केले असून त्याच स्तरावर सेवा पुरविण्यांत येत आहेत.

सावेडी उपकार्यालयात कामकाज पहाणेसाठी सहा.आयुक्त दर्जाचे श्री आर.ए.देशमुख,प्रशासनाधिकारी यांची आदेश क्र.साप्रवि १४२५ दि.१९/७/०४ अन्वये प्र.झोनल ऑफिसर नेमणुक केलेली असून सदर पदावर ते कार्यरत आहेत.

मा.शासनांकडून सहा.आयुक्त हे एक पद मंजूर असून आणखी २ पदे निर्माण करण्या बाबतचा प्रस्ताव शासनांस सादर केलेला आहे. मंजूर असलेल्या पदाची वेतनश्रेणी ७४५०-११५०० अशी मंजूर आहे.

अहमदनगर महानगरपालिका केडर नं. १ मध्ये अनुक्रमे निलिमा जाधव,आर.एम.ढाकणे ,व श्री आर.ए.देशमुख हे सेवाजेष्ठतेने आहेत.पैकी श्री ढाकणे व श्री देशमुख हे कायदयाचे पदवीधर आहेत. त्यामुळे ते सहा.आयुक्त या पदासाठी पात्र आहेत. वरील सर्व अधिकां-याची वेतनश्रेणी ही सहा.आयुक्त या पदासांठी मंजूर असलेली वेतनश्रेणी समान आहेत. त्यामुळे या पदावर नियुक्ती केल्यास वेतनात फरक पडत नाही.

मुंबई प्रांतिक मनप अधिनियम १९४९ चे कलम ४५ (२) अन्वये महानगपालिकेस योग्य अशा व्यक्तीची सहा.आयुक्त या पदी नेमणुक करता येईल अशी तरतूद आहे.

दरम्यान सावेडी उपकार्यालय कार्यान्वीत झालेने सदर ठिकाणी प्रभारी म्हणून श्री आर.ए. देशमुख यांची नियुक्ती केलेली असून त्यांना त्या स्तरावर निर्णयासाठी काही अधिकार प्रदान करणेत येत आहेत.त्यामुळे त्यांना समान वेतनश्रेणी मध्ये सहा.आयुक्त या पदावर नियुक्ती करणे योग्य होईल.

सर्वसाधारण सभेमध्ये झालेल्या चर्चे प्रमाणे कर्मचा-या विषयीचे विषय स्थायी समिती समोर घेणे आवश्यक आहे.

सबब प्रकरण मा.स्थायी समितीपुढे सादर.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिके मध्ये आस्थापना सुचीवरील वैधानिक पदावरील नियुक्ती करणे बाबत कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये चर्चा करणेत येवून चर्चे अंती ठरल्याप्रमाणे श्री आर.ए.देशमुख यांना सहाय्यक आयुक्त या पदावर नियुक्ती करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी .

सुचक - मा.श्री पाउलबुध्दे वि.ना.

अनुमोदक - मा.श्री जाधव कृ.द.

ठराव सर्वानुमते मंजूर .

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर .
## मा. स्थायी समिती सभा क्र.९

विषय क्रमांक - ८ दिनांक २९ /११/२००४

---

ठराव क्रमांक - ८ दिनांक २९/११/२००४

**प्रस्तावाचा विषय** - अहमदनगर महानगरपालिकेचे प्रशासकीय कामात गतीमानता आणणे आणि कामाचे व्यवस्थे साठी शहर अभियंता,कनिष्ठ अभियंते व मॅकेनिकल इंजिनिअर यांचे कामकाज विभागणी बाबत ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** - अहमदनगर नगर परिषदेचे दि.१/६/२००३ रोजी महानगरपालिकेत रूपांतर झाले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी नुसार आयुक्त,मुख्यलेखा परिक्षक ,शहर अभियंता व नगर सचिव इत्यादी पदे त्यामुळे अस्तित्वात आलेली आहे. आज अखेर महानगरपालिकेचा कर्मचारी आराखडा आकृती बंध निश्चीत झालेला नसून नगर परिषदेच्या आस्थापने वरील कर्मचारी वर्ग सर्व कामकाज पाहत आहे.

महानगरपालिकेच्या स्थापने नंतर प्रभारी शहर अभियंता म्हणून श्री एन.बी. मगर हे काम पहात होते. तसेच श्री बी.एम.बडवे हे ही समान वेतन श्रेणीतील (रूपये ८०००-१३५००)अभियंता असून इतर चार कनिष्ठ अभियंते (वेतनश्रेणी ६५००-१०५००) शहर अभियंत्याच्या प्रभाग अधिकारी (वॉर्ड ऑफिसर) म्हणून कार्यरत असून रूपये ५.०० लक्ष पर्यतची बीले स्वाक्षरी करण्यांचे अधिकार त्यांना देण्यांत आलेले आहेत.

श्री.बी.एस.आहिरे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता दर्जाचे अधिकारी अहमदनगर महानगरपालिकेत दि.२४/८/२००४ रोजी शहर अभियंता म्हणून रूजू झालेले असल्यामुळे नव्याने बांधकाम विभागाचा आकृतीबंध निश्चीत करणे योग्य वाटते.

शहर अभियंता - ( श्री बी.एस.आहिरे)

— उपशहर अभियंता तथा शहर अभियंत्याचे स्वीय सहाय्यक (श्री बडवे बी.एम.)

— उपशहर अभियंता ( श्री मगर एन.बी.)

| कनिष्ठ अभियंता | कनिष्ठ अभियंता | कनिष्ठ अभियंता | कनिष्ठ अभियंता |
|---|---|---|---|
| (श्री काकडे एम.डी) | ( श्री मेहेत्रे आर.जी.) | (श्री आर.जी.सातपुते) | (श्री सोनटक्के व्ही.जी.) |
| ५,६,८,९,१० | १,२,११,१२,१३ | ३,४,१४,१५ | १६,१७,१८,१९,२०,२१ |
| (१) | (२) | (३) | (४) |

वरील आकृती बंधा नुसार अभियंत्याचे एकमेंकावर नियंत्रण राहील सध्या कनिष्ठ अभियंत्याना रूपये ५.०० लक्ष पर्यतचे बीलावर स्वाक्षरीचे अधिकार आहेत मात्र पर्यवेक्षणाच्या अभावामुळे कामाच्या दर्जावर परिणाम संभवतो त्यामुळे या प्रमाणे कनिष्ठ अभियंत्या कडे जास्त अधिकार अयोग्य वाटते.

वरील बाबींचा विचार करून उपशहर अभियंता (श्री मगर एन.बी.) यांचे कडे रू. १.५० लक्ष पर्यतचे कामाचे संपूर्ण पर्यवेक्षण व बीलावर स्वाक्षरीचे अधिकार प्रदान करणे इष्ट वाटते.

तसेच रू. ०.५० लक्षा पर्यत (रू.पन्नास हजार) छोटी कामे कनिष्ठ अभिंयंता तथा वॉर्ड ऑफिसर यांचे स्तरावर तपासून बीले स्वाक्षरी करण्यांचे अधिकार प्रदान केल्यास छोटी मात्र अत्यावश्यक कामे त्यांचे स्तरावर केली जातील.रूपये १.५० च्या वरील सर्व कामावर उपशहर अभियंता व त्या नंतर शहर अभियंता यांचे पर्यवेक्षण १००% राहिल्यास कामाचा दर्जा राखला जाईल. वर उल्लेख केलेल्या मर्यादे पर्यतच्या बीलाच्या मापन पुस्तीकेवर त्या-त्या दर्जाच्या अभिंयंत्याच्या स्वाक्ष-या राहतील वरील सर्व बीले विशिष्ट मर्यादे नुसार उपायुक्त (सामान्य) यांचे मार्फत मा.आयुक्ताकडे मंजूरीसाठी सादर करणे योग्य राहील.

शहर अभियंत्याचे स्वीय सहाय्यक हे उपशहर अभियंता दर्जाचे आहेत. त्यांचे कडे क्षेत्रीय पर्यवेक्षणाची कोणतीही जबाबदारी सोपविण्यांत येवू नये.त्यांचे कडे शहर अभियंता यांचे नियंत्रणाखाली खालील कामे सोपविणे इष्ट वाटते.

१. तांत्रिक मंजूरीसाठी प्राप्त प्रस्ताव तपासून तांत्रिक मंजूरीसाठी शहर अभियंता यांचे कडे सादर करणे.
२. शहर अभियंता यांचे नियंत्रणास यांचे सूचने नुसार काही कामाचे त्यांचे स्तरावर नकाशे व अंदाज पत्रके तयार करून सादर करणे.
३. शहर अभियंता यांचे नियंत्रणास अधिन राहून अभियंत्या व्यतिरिक्त शहर अभियंतत्याच्या कार्यालयातील कर्मचा-यावर देखरेख ठेवणे.

पाणी पुरवठयाची वितरण व्यवस्थेची सर्व कामे बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंतेच पाहतात.यामुळे मोठया योजना व्यतिरिक्तची कामे प्रचलीत पध्दतीने मात्र वर नमूद केलेल्या आर्थिक मयादे नुसारच पुढे चालू ठेवणे इष्ट वाटते.

पाणी पुरवठयाच्या स्त्रोतापासून ते वितरण सर्व कामे व्यवस्थे पर्यतचे काम श्री परिमल निकम ,मॅकेनिकल इंजिनिअर हे केडर नं. १ चे अधिकारी पहातात.३६ कि.मी. लांबीची ही व्यवस्था अत्यंत जिकीरीची असून परिस्थीती व अडचण पाहून तातडीने काही निर्णय घ्यावे लागतात. त्यामुळे त्यांचेवर शहर अभियंता यांचे नियंत्रण न ठेवता त्याचा विभाग वेळगा ठेवून त्यावर आयुक्त व उपायुक्त यांचे नियंत्रण ठेवल्यास वेळचे वेळी निर्णय घेणे सोईस्कर होईल.

सध्या श्री बडवे यांचेकडे १. शहरातील धोकादायक इमारतीवर कारवाई २. टॅन्करद्वारे होणा-या पाणी पुरवठयावर नियंत्रण व नियमन ३. बोअरवेलचे नियंत्रण व नियमन इत्यादी कामे आहेत.यातील अ.क्र. १ चे काम त्या त्या कनिष्ठ अभियंत्या कडून करवून घेणे तर अ.क्र. २ व ३ ची कामे श्री निकम यांना जादा अतांत्रिक कर्मचारी वर्ग देवून त्यांचे कडून करवून घेणे साईस्कर होईल.

वरील प्रस्तावातील आराखडयामुळे व पदनाम बदलामुळे कोणतेही नविन पद निमाण होत नाही.तसेच कोणत्याही कर्मचां-याच्या वेतनश्रेणी मध्ये फरक पडत नाही. त्यामुळे म.न.पा.चे अर्थ संकल्पावर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही.

वरील बाबीचा विचार करता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (२) व (३) अन्वये स्थायी समिती अंतिम मंजूरी देवू शकते

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिकेचे प्रशासकीय कामात गतिमानता आणणे आणि कामाचे व्यवस्थेसाठी शहर अभियंता, उपशहर अभियंता ,कनिष्ठ अभियंता व मॅकेनिकल इंजिनिअर यांचे कामकाज विभागणीस मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार उपशहर अभियंता म्हणून श्री मगर एन.बी.यांना रक्कम रूपये पाच लक्ष पर्यत कामाचे संपूर्ण पर्यवेक्षण,बीलावर स्वाक्षरी तसेच रक्कम रूपये पाच लक्ष पर्यत तांत्रिक मंजूरी देण्याचे अधिकार देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सदर ठरावास मा.श्री जाधव कृ.द., मा.श्री कोतकर भा.ए., मा.श्री पवार ना.शा.,मा.श्री जगताप नि.वि.,मा.श्रीमती शेख सु.लि. सदस्य स्थायी समिती सदस्य समिती यांचा विरोध .

सुचक - मा.श्री कानडे अ.ना.

अनुमोदक - मा.श्री पाउलबुध्दे वि.ना.

ठराव बहुमताने मंजूर .

सही /- sdxxx

सभापती,

स्थायी समिती,

अहमदनगर महानगरपालिका